“खरे स्नेही बनून, सर्व ओझे बाबांना देऊन मजेचा अनुभव करा, मेहनत मुक्त बना”

आज बापदादा आपल्या चोहो बाजूंच्या निश्चिंत बादशहांच्या संघटनला बघत आहेत. इतकी मोठी बादशहांची सभा साऱ्या कल्पामध्ये या संगमच्या वेळी होते. स्वर्गामध्ये देखील बादशहांची इतकी मोठी सभा नसेल. परंतु आता बापदादा सर्व बादशहांच्या सभेला पाहून हर्षित होत आहेत. दूर असणारे देखील हृदयाजवळ असल्यासारखे वाटत आहेत. तुम्ही सर्व डोळ्यांमध्ये सामावलेले आहात, ते हृदयामध्ये सामावलेले आहेत. किती सुंदर सभा आहे, आजच्या विशेष दिवशी सर्वांच्या चेहऱ्यांवर अव्यक्त स्थितीच्या स्मृतीची झलक दिसून येत आहे. सर्वांच्या हृदयामध्ये ब्रह्मा बाबांची स्मृति भरून राहिली आहे. आदि देव ब्रह्मा बाबा आणि शिवबाबा दोघेही सर्व मुलांना पाहून हर्षित होत आहेत.

आज तर सकाळी दोन वाजल्यापासून बापदादांच्या गळ्यामध्ये भिन्न-भिन्न प्रकारच्या माळा येऊन पडल्या होत्या. या फुलांच्या माळा तर कॉमन आहेत. हिऱ्यांच्या माळा देखील काही मोठी गोष्ट नाहीये परंतु स्नेहाच्या अमूल्य मोत्यांच्या माळा अति श्रेष्ठ आहेत. प्रत्येक मुलाच्या हृदयामध्ये आजच्या दिवशी स्नेह विशेष इमर्ज झाला होता. बापदादांकडे चार प्रकारच्या भिन्न-भिन्न माळा इमर्ज होत्या. पहिल्या नंबरला श्रेष्ठ मुलांची माळा, जी बाप समान बनणारी श्रेष्ठ पुरुषार्थी मुले आहेत, अशी मुले माळेच्या रूपामध्ये बाबांच्या गळ्यामध्ये ओवलेली होती. पहिली माळा सर्वात लहान होती. दुसरी माळा - हृदयाच्या समीप प्रेमाने समान बनणाऱ्या पुरुषार्थी मुलांची माळा; ते श्रेष्ठ पुरुषार्थी, हे पुरुषार्थी. तिसरी माळा होती - जी मोठी होती ती होती - स्नेही सुद्धा, बाबांच्या सेवेमध्ये साथी देखील आहेत परंतु कधी तीव्र पुरुषार्थी आणि कधी, कधी-कधी अधिकतर वादळांना तोंड देणारी; परंतु इच्छा ठेवणारी मुले, संपन्न बनण्याची इच्छा देखील चांगली असते. चौथी माळा होती - तक्रार करणाऱ्यांची. भिन्न-भिन्न प्रकारच्या मुलांच्या अव्यक्त फरिश्ता चेहऱ्याच्या रूपामध्ये माळा होत्या. बापदादा देखील भिन्न-भिन्न माळांना पाहून खुश देखील होत होते आणि स्नेह तसेच सकाश एकत्र देत होते. आता तुम्ही सर्व स्वतःच आपला विचार करा की, मी कोण? परंतु चोहो बाजूंच्या मुलांमध्ये विशेष संकल्प वर्तमान वेळी हृदयामध्ये इमर्ज आहे की, ‘आता काहीतरी करायचेच आहे’, हा उमंग-उत्साह मेजॉरिटीमध्ये संकल्प रूपामध्ये आहे. स्वरूपामध्ये नंबरवार आहेत परंतु संकल्पामध्ये सर्वांच्या आहे.

बापदादा सर्व मुलांना आजच्या स्नेह दिना निमित्त, स्मृती दिना निमित्त, समर्थिदिना निमित्त विशेष हृदयापासून आशीर्वाद आणि हृदयापासून शुभेच्छा देत आहेत. आजचा विशेष स्नेहाचा दिवस असल्या कारणाने मेजॉरिटी स्नेहामध्ये हरवून गेले आहेत. असेच पुरुषार्थामध्ये सदैव स्नेहामध्ये हरवून जा. लवलीन रहा (एकरूप होऊन रहा); तर सोपे साधन आहे स्नेह, हृदयापासूनचा स्नेह. बाबांच्या परिचयाच्या स्मृति सहित स्नेह. बाबांच्या प्रेमाच्या प्राप्तींनी भरलेला स्नेह. स्नेह खूप सोपे साधन आहे कारण स्नेही आत्मा मेहनती पासून वाचते. स्नेहामध्ये लीन झाल्या कारणाने, स्नेहामध्ये हरवून गेल्या कारणाने कोणत्याही प्रकारची मेहनत मनोरंजना प्रमाणे अनुभव होईल. स्नेही स्वतःच देहाच्या भाना पासून, देहाच्या नात्यांच्या विचारांपासून, देहाच्या दुनियेच्या विचारांपासून दूर, स्नेहा मध्ये आपोआप मग्न होऊन राहतात. हृदयापासूनचा स्नेह हा बाबांच्या समीप असल्याचा, सोबत असल्याचा, समान असल्याचा अनुभव करवतो. स्नेही सदैव स्वतःला बाबांच्या आशीर्वादांचे पात्र समजतात. स्नेह असंभवला देखील सहज संभव करतो. सदैव आपल्या मस्तकावर, डोक्यावर बाबांच्या सहयोगाचा, स्नेहाचा हात अनुभव करतात. निश्चय-बुद्धी, निश्चिंत राहतात. तुम्हा सर्व स्थापनेच्या आदिकाळातील मुलांना आदिकाळाचा अनुभव आहे, आत्ता देखील सेवेच्या आदिकाळाच्या निमित्त मुलांना अनुभव आहे की आदिकाळामध्ये सर्व मुलांना बाबा मिळाले, त्या स्मृतीमुळे स्नेहाचा नशा किती होता! नॉलेज तर नंतर मिळाले परंतु सर्वात पहिला नशा स्नेहामध्ये हरवून गेले आहेत. बाबा स्नेहाचा सागर आहेत तर मेजॉरिटी मुले आदिकाळापासून स्नेहाच्या सागरामध्ये हरवलेली आहेत, पुरुषार्थाच्या गतीमध्ये खूप चांगल्या स्पीडने चालले आहेत. परंतु काही मुले स्नेहाच्या सागरामध्ये हरवून जातात, कोणी फक्त डुबकी मारून बाहेर येतात; म्हणून

जितकी हरवून गेलेल्या मुलांना मेहनत कमी लागते तितकी त्यांना नाही. कधी मेहनत, कधी मोहब्बत, दोन्हीमध्ये राहतात. परंतु जे स्नेहामध्ये लवलीन राहतात ते सदैव स्वतःला छत्रछायेच्या आत राहण्याचा अनुभव करतात. हृदयापासूनचा स्नेह असणारी मुले मेहनतला देखील मोहब्बतमध्ये बदलून टाकतात. त्यांच्या समोर पहाडाएवढी समस्या देखील पहाड नाही परंतु कापसासारखी अनुभव होते. दगड सुद्धा पाण्यासारखा अनुभव होतो. मग जसे आज विशेष स्नेहाच्या वायुमंडळामध्ये राहिला तर अनुभव केलात ना की, मेहनत आहे की मनोरंजन झाले!

आज तर स्नेहाचा सर्वांना अनुभव झाला ना! स्नेहामध्ये हरवून गेला होता का? हरवून गेला होता सर्वजण! आज मेहनत केल्याचा अनुभव झाला का? कोणत्याही गोष्टीमध्ये मेहनतीचा अनुभव झाला? 'का', 'कशाला', 'कसे'(?) असा संकल्प आला? स्नेह सर्व विसरायला लावतो. तर बापदादा म्हणतात की बाबांच्या या स्नेहाला विसरू नका. स्नेहाचा सागर मिळाला आहे, मनसोक्त लहरत रहा. जेव्हा पण कोणत्या मेहनतीचा अनुभव होईल ना, कारण की माया मध्ये-मध्ये पेपर तर घेते, परंतु त्यावेळी स्नेहाच्या अनुभवाला आठवा. तर मेहनत प्रेमामध्ये बदलून जाईल. अनुभव करून पहा. काय आहे, चूक कोणती होते! त्यावेळी 'काय…, का….' यामध्ये खूप जाता. जे येते ते जाते सुद्धा परंतु जाणार कसे? स्नेहाला आठवल्यामुळे मेहनत निघून जाईल कारण की सर्वांना भिन्न-भिन्न वेळी बाप-दादा दोघांच्याही स्नेहाचा अनुभव तर आहे. आहे ना अनुभव! कधीतरी केला आहे ना,(!) चला, नेहमी केला नसेल परंतु कधीतरी केला आहे. त्या वेळेला आठवा - बाबांचा स्नेह काय आहे! बाबांच्या स्नेहामुळे काय-काय अनुभव केला! तर स्नेहाच्या स्मृतीने मेहनत बदलून जाईल कारण बाप-दादांना कोणत्याही मुलाची मेहनतची स्थिती चांगली वाटत नाही. माझी मुले आणि मेहनत! तर मेहनत मुक्त कधी बनणार? हे संगमयुगच एक असे आहे ज्यामध्ये मेहनत मुक्त, आनंदच आनंदामध्ये राहू शकता. जर आनंद नसेल तर कोणते ना कोणते ओझे बुद्धीमध्ये आहे, बाबांनी सांगितले आहे ओझे मला द्या. 'मी'पणाला विसरून ट्रस्टी बना. जबाबदारी बाबांना द्या आणि स्वतः खऱ्या मनाची मुले बनून खा-प्या, खेळा आणि मजा करा कारण हे संगमयुग सर्व युगांमध्ये मजेचे युग आहे. या मजेच्या युगामध्ये देखील आनंद साजरा करणार नाही, तर मग कधी करणार? बापदादा जेव्हा बघतात की मुले ओझे उचलून खूप मेहनत करत आहेत. देत नाहीत, आपणच उचलत आहेत. मग बाबांना तर करुणा वाटेल ना, दया येईल ना. मजेच्या वेळी मेहनत! स्नेहामध्ये हरवून जा, स्नेहाच्या वेळेला आठवा. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या वेळी विशेष स्नेहाची अनुभूति होतेच होते, झाली आहे. बाबा जाणतात की, झाली आहे परंतु मुले त्या अनुभूतीची आठवण करत नाहीत. मेहनतीलाच बघत राहतात, अडकून राहतात. जर आज देखील अमृतवेलेपासून आतापर्यंत बाप-दादा दोन्ही अथॉरिटीच्या प्रेमाचा हृदयापासून अनुभव केला असेल तर आजच्या दिवसाची जरी आठवण केलीत तरी अशा प्रेमा समोर मेहनत समाप्त होऊन जाईल.

आता बापदादा या वर्षी प्रत्येक मुलाला स्नेह-युक्त, मेहनत-मुक्त पाहू इच्छितात. मेहनतीचे नामोनिशाणही मनामध्ये राहू नये, जीवनामध्ये राहू नये. असे होऊ शकते? होऊ शकते का? जे समजतात की, करूनच सोडणार आहोत, हिंमत वाले आहेत त्यांनी हात वर करा. आज विशेष अशा प्रत्येक मुलाला बाबांचे विशेष 'मेहनत मुक्त होण्याचे' वरदान आहे. स्वीकार आहे ना? मग काहीतरी झाले तर काय करणार? 'काय, का' असे तर करणार नाही ना? प्रेमाच्या वेळेची आठवण करा. घेतलेल्या अनुभवाची आठवण करा आणि अनुभवामध्ये हरवून जा. तुमचा वायदा आहे. बाबा देखील मुलांना प्रश्न विचारतात की, तुम्हा सर्वांचा वायदा आहे की आम्ही बाबांद्वारे २१ जन्मांसाठी जीवनमुक्त अवस्थेचे पद प्राप्त करत आहोत, करणारच, तर जीवनमुक्तमध्ये मेहनत असते का? २१ जन्मांमध्ये एक जन्म संगमचा आहे. तुमचा वायदा २१ जन्मांचा आहे, २० जन्मांचा नाहीये. तर आतापासून मेहनत मुक्त अर्थात जीवनमुक्त, निश्चिंत बादशहा. आत्ताचे संस्कार आत्म्यामध्ये २१ जन्म इमर्ज राहतील. तर २१ जन्मांचा वारसा घेतला आहे ना! की घ्यायचा आहे अजून? तर अटेंशन प्लिज, मेहनत मुक्त, संतुष्ट रहा आणि संतुष्ट करा. फक्त राहायचे नाहीये, करायचे देखील आहे. तेव्हाच मेहनत मुक्त रहाल. नाहीतर रोज कोणत्या ना कोणत्या ओझ्याच्या गोष्टी, मेहनतीच्या गोष्टी, 'काय', 'का' च्या भाषेमध्ये येतील. आता समयाच्या समीपतेला बघत आहात. जसा वेळ जवळ येत आहे, तसा तुम्हा सर्वांचा देखील बाबांसोबत समीपतेचा (जवळीकतेचा) अनुभव वाढला पाहीजे ना. बाबांसोबतची तुमची समीपता वेळेच्या समीपतेला समाप्त करेल. काय तुम्हा सर्व मुलांना आत्म्यांच्या दुःख-अशांतीचा आवाज कानांनी ऐकू येत नाही आहे का! तुम्हीच पूर्वज देखील आहात, पूज्य देखील

आहात. तर हे पूर्वज आत्म्यांनो, हे पूज्य आत्म्यांनो, विश्व कल्याणाचे कार्य कधी संपन्न करणार?

बापदादांनी समाचारांमध्ये बघितले आहे, प्रत्येक विंगवाले आपापली मिटिंग करतात, प्लॅन बनवतात की विश्व कल्याणाच्या गतिला तीव्र कसे करायचे? प्लॅन तर खूप चांगले बनवतात, परंतु बापदादा विचारतात - तरीही कधी पर्यंत? याचे उत्तर दादी देतील - शेवटी कधीपर्यंत? पांडव उत्तर देणार - शेवटी कधीपर्यंत? सर्व विंग्जवाले 'बाबांची प्रत्यक्षता व्हावी', हाच प्लॅन बनवण्यामध्ये लक्ष्य ठेवतात. परंतु प्रत्यक्षता होईल दृढ प्रतिज्ञेने. प्रतिज्ञेमध्ये दृढता, कधी कोणत्या कारणाने अथवा गोष्टींमुळे दृढता कमी होऊन जाते. प्रतिज्ञा खूप चांगली करतात, अमृतवेलेला जर तुम्ही ऐकू शकला ना, बाबा तर ऐकतात, तुम्हाला सायन्सने अजून असे साधन दिलेले नाहीये ज्याने तुम्ही सर्वांच्या मनातील आवाज ऐकू शकाल. बापदादा ऐकतात, आश्वासनांच्या माळा, संकल्प करण्याच्या गोष्टी इतक्या छान-छान मन खुश करणाऱ्या असतात जे बापदादा म्हणतात - 'वाह बच्चे वाह!' ऐकवू काय-काय गोष्टी करता! जेव्हा कर्मामध्ये येता ना, मुरली पर्यंत देखील ७५ टक्के ठीक असतात. परंतु जेव्हा कर्मयोगामध्ये येता तेव्हा त्यामध्ये फरक पडतो. काही संस्कार, काही स्वभाव; स्वभाव आणि संस्कार सामना करतात, त्यामध्ये दृढ प्रतिज्ञे ऐवजी साधारण प्रतिज्ञा होते. दृढतेचे परसेंटेज कमी होते.

बापदादा, मुलांचा एक खेळ पाहून हसत असतात. कोणता खेळ करता, सांगू काय? बापदादांना तर खेळ बघताना दया येते, मजा येत नाही कारण की बापदादा बघतात मुले आपली गोष्ट दुसऱ्यांवर ढकलण्यामध्ये खूप हुशार आहेत. काय खेळ करतात? गोष्टी बनवतात. विचार करतात - कोण बघणार आहे! मला माहित आणि माझ्या मनाला माहित. बाबा तर परमधाम मध्ये, सूक्ष्मवतन मध्ये बसले आहेत. जर कोणाला म्हटले की, हे करायचे नाही, तर खेळ काय करतात, माहिती आहे? हां, झाले तर खरे, परंतु..., हा 'परंतु' जरूर घालतात. परंतु काय? असे होते ना, असे केले ना, असे होते ना, तेव्हाच झाले, मी नाही केले, असे झाले म्हणून झाले. आता याने केले, म्हणून केले. नाही तर मी नसते केले, तर हे काय झाले? आपली समज, रियलायझेशन कमी आहे. अच्छा, समजा त्याने असे केले, तेव्हाच तुम्ही केले, चला खूप छान. पहिला नंबर तो झाला, दुसरा नंबर तुम्ही झालात, ठीक आहे. बापदादा हे देखील मानतात. तुम्ही पहिला नंबर नाही आहात, दुसरा नंबर आहात; परंतु जर तुम्ही विचार करत असाल की, पहिला नंबर परिवर्तन करेल तर मी ठीक होईन, ठीक आहे? हेच समजता ना त्यावेळी. समजा, पहिला नंबर परिवर्तन करत असेल. बापदादा इतर सर्व पहिल्या नंबरवाल्यांना म्हणतात तुमची चूक आहे, तुम्हाला परिवर्तन करायचे आहे, ठीक आहे. अच्छा, जर पहिल्या नंबरवाल्याने परिवर्तन केले, तर पहिला नंबर कोणाला मिळेल? तुमचा तर पहिला नंबर नसेल. परिवर्तन शक्तिमध्ये तुमचा पहिला नंबर नसेल. पहिला नंबर तुम्ही त्याला दिलात तर तुमचा नंबर कोणता झाला? दुसरा नंबर झाला ना. जर तुम्हाला म्हटले - तुमचा दुसरा नंबर आहे तर मान्य कराल. करणार मान्य? मग म्हणाल - 'नाही, असे होते, तसे होते, कसे होते...' ही भाषा खूप खेळामध्ये येते. 'असे-तसे-कसे' हा खेळ बंद करून मला परिवर्तन करायचे आहे. मी परिवर्तन करून दुसऱ्याला परिवर्तित करेन, परंतु जर दुसऱ्याला परिवर्तित करू शकत नसाल तर शुभ भावना, शुभ कामना तर ठेवू शकता! ती तर तुमची स्वतःची गोष्ट आहे ना! तर 'हे अर्जुन' मला बनायचे आहे. विश्वाचे पहिले राज्यकर्ता लक्ष्मी-नारायण यांच्या समीप तुम्हाला यायचे आहे की दुसऱ्या नंबरवाल्याला यायचे आहे?

बापदादांची या वर्षाची हीच आशा आहे की सर्व ब्राह्मण आत्मे, ब्रह्माकुमार-ब्रह्माकुमारी जसे इथे हा बॅज लावता ना, सर्वजण लावता ना! इथे देखील येता तर तुम्हाला बॅज मिळतो ना, भले कागदाचा, किंवा सोन्याचा, किंवा चांदीचा. तर इथे जसा बॅज लावता तसा अंतःकरणामध्ये, मनामध्ये हा बॅज लावा की, 'मला परिवर्तन करायचे आहे'. मला निमित्त बनायचे आहे. याने बदलावे, ही गोष्ट बदलावी, ही व्यक्ती बदलावी, ही परिस्थिती बदलावी, नाही. मला बदलायचे आहे. गोष्टी तर येणार, तुम्ही उंच जात आहात, उंच स्थानावर समस्या देखील मोठ्या येतात ना! परंतु जसे आज नंबरवार यथाशक्ती स्नेहाच्या स्मृतीचे वायुमंडळ होते. तसे आपल्या मनामध्ये सदैव स्नेहामध्ये लवलीन होऊन राहण्याचे वायुमंडळ सदैव इमर्ज ठेवा.

बापदादांकडे समाचार खूप चांगले-चांगले येतात. संकल्प सुद्धा खूप छान आहेत. स्वरूपामध्ये येण्यामध्ये यथाशक्ती होतात. आता दोन मिनिटांसाठी सर्वजण परमात्म स्नेह, संगमयुगातील आत्मिक आनंदाच्या स्थितीमध्ये स्थित व्हा. (ड्रिल) अच्छा - हाच अनुभव दररोज वारंवार वेळोवेळी अनुभव करत रहा. स्नेहाला विसरू

नका. स्नेहा मध्ये हरवून जायला शिका. अच्छा!

चोहो बाजूच्या योगयुक्त, युक्तियुक्त, राजयुक्त, स्वतः देखील रहस्याला जाणून सदैव संतुष्ट करणाऱ्या आणि संतुष्ट राहणाऱ्या, फक्त स्वतः संतुष्ट रहायचे नाहीये, संतुष्ट करायचे सुद्धा आहे, अशा सदैव स्नेहाच्या सागरामध्ये लवलीन मुलांना, सदैव बाप समान बनण्याच्या तीव्रगतीच्या पुरुषार्थी मुलांना, सदैव असंभवला देखील सहज संभव करणाऱ्या श्रेष्ठ आत्म्यांना, सदैव बाबांच्या सोबत राहणाऱ्या आणि बाबांच्या सेवेमध्ये साथी होऊन राहणाऱ्या अशा खूप-खूप लक्की आणि लवली (भाग्यवान आणि लाडक्या) मुलांना आजच्या अव्यक्त दिवसाची, अव्यक्त फरिश्ता स्वरूपाची प्रेमपूर्वक आठवण आणि मनापासून आशीर्वाद, अच्छा.

वरदानः- आठवणीच्या जादुई मंत्राद्वारे सर्व सिद्धी प्राप्त करणारे सिध्दी स्वरूप भव

बाबांची आठवणच जादूचा मंत्र आहे, या जादूच्या मंत्राद्वारे जी सिद्धी पाहिजे ती प्राप्त करू शकता. जसे स्थूलमध्ये देखील कोणत्याही कार्याच्या सिद्धीसाठी मंत्र जपतात, तसे इथे सुद्धा जर कोणत्याही कार्यामध्ये सिद्धी पाहिजे तर हा आठवणीचा महामंत्रच विधी स्वरूप आहे. हा जादू मंत्र सेकंदामध्ये परिवर्तन करतो. याला नेहमी लक्षात ठेवा तर कायमचे सिध्दि स्वरूप बनाल कारण आठवणीमध्ये राहणे काही मोठी गोष्ट नाहीये, निरंतर आठवणीमध्ये राहणे - हीच मोठी गोष्ट आहे, यामुळेच सर्व सिद्धी प्राप्त होतात.

सुविचारः- सेकंदामध्ये विस्ताराला सार रूपामध्ये सामावून घेणे अर्थात अंतिम सर्टिफिकेट घेणे.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारेः- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा.

जसे एखादे शरीरावरील वस्त्र सहज काढू शकता तसे हे शरीर रुपी वस्त्र देखील सहज काढू शकाल आणि सहजच वेळेवर धारण करू शकाल, याचा अभ्यास पाहिजे. जर वस्त्र घट्ट अथवा टाईट असेल तर सहज काढू शकत नाही, तसे हे देहरुपी वस्त्र देखील कोणत्या संस्कारामध्ये चिकटलेले घट्ट अथवा टाईट नसावे. यासाठी सर्व गोष्टींमध्ये इझी रहा, जर इझी रहाल तर सगळी कामे इझी होतील. जितके जुन्या संस्कारांपासून न्यारे रहाल तितकी अवस्था देखील न्यारी अर्थात विदेही सहज बनेल.